# कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - ४१६३०९ महाराष्ट्र

दूरध्वनी क्रमांकः- ०२३४६-२७१२१२, ई - मेल - princpalkundal@gmail.com


*************************************************************

**जा.क्र.कक्ष-४/भांडार/जाहिर लिलाव/2597/सन २०२४-२५, दिनांक :- 03.03.२०२५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी,सांगली**

विषय- कुंडल विकास,प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल या कार्यालयातील निर्लेखित केलेल्या वस्तूंची जाहिर लिलावाव्दारे विक्री करणेबाबत.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीच्या दोन प्रती सोबत जोडण्यात येत आहेत. तरी सदर जाहिरात जास्तीत जास्त खप असलेल्या दैनिक वर्तमानपत्रामध्ये एक वेळ प्रसिद्धीसाठी पाठविणेस विनंती आहे.प्रस्तुत प्रकरणी, जाहिरातीमधील एकूण कामांचे मुल्य अंदाजे ५ लक्ष इतके आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अनुज्ञेय ठरत असलेले देयक अदा करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ. कार्यालयाचे नाव :- | महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल |
| ब. जाहिरात बील पाठविण्याचा पत्ता :- | महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल, मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली, पिन -४१६३०९ |
| क.जाहिरात प्रसिद्धीचा दिनांकः- | दिनांक ०७/०३/२०२५ |
| ड.प्रसिद्धीची पातळी व वर्तमानपत्रः- | जिल्हास्तरावरील जास्तीत जास्त खप असलेले एक दैनिक वर्तमानपत्र. |

सहपत्र-वरीलप्रमाणे

**(भरत बाबूराव शिंदे)**
**संचालक**
**कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**

प्रतिलिपी- महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी - NIC, समन्वयक यांना सहपत्रासह माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.

२.०० प्रस्तुत प्रकरणी विषयांकित जाहिरात दि.०७/०३/२०२५ रोजी www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस विनंती आहे.

**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**
मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - ४१६३०९ महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक - ०२३४६ - २७१२१२ ई - मेल - princpalkundal@gmail.com

**************************************************************************

## जाहिर लिलाव

कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल या कार्यालयामधील निर्लेखित केलेले खालील यादीमधील विविध साहित्य जाहिर लिलावाव्दारे विकणे आहे.सदर साहित्यांचा जाहिर लिलाव दिनांक १८.०३.२०२५ रोजी या कार्यालयाच्या खालील नमूद पत्त्यावर करण्यात येणार आहे.इच्छुक खरेदीदारांनी लिलावाच्या दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

**अटी व शर्ती -:**

१. इच्छुक खरेदीदारांनी लिलावामध्ये भाग घेण्यासाठी विहीत नमुन्यात माहिती सादर करावी व त्यांना अनामत रक्कम रू.१०,०००/- रोख स्वरूपात लिलाव सुरू होण्यापुर्वी भरावी लागेल.

२. निर्लेखित साहित्यांची 'जेथे व जसे आहे', तसे या तत्वावर विक्री करणे आहे.

३. लिलावाव्दारे विक्री करावयाचे साहित्य हे कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल या कार्यालयाच्या परिसरात खालील नमूद पत्त्यावर दि.०७.०३.२०२५ ते दि.१७.०३.२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.१५ वाजेपर्यंत) इच्छुक खरेदीदारांना पाहता येईल.

४. लिलावामध्ये सर्वाधिक रक्कमेची बोली लावणा-या खरेदीदारांची बोली स्विकारण्यात येईल. सदर खरेदीदारास संपुर्ण रक्कम ०७ दिवसात भरावी लागेल. त्यानंतर खरेदीदारास निर्लेखित साहित्य हे त्याचे स्वजबाबदारीवर घेऊन जाण्याची परवानगी देण्यात येईल. त्याकामी या कार्यालयाकडून कोणतीही सुविधा अथवा इतर खर्च देण्यात येणार नाही.

५. खरेदी केलेले साहित्य लिलावाच्या तारखेपासून १० दिवसांच्या आत घेऊन जाण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील. लिलावानंतर १० दिवसात जर खरेदीदाराने साहित्य नेले नाही, तर दर दिवशी रू.२०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

६. इच्छुक खरेदीदारांचे GST रजिस्ट्रेशन क्रमांक व सर्टीफीकेट असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना लिलावामध्ये भाग घेता येणार नाही.

७. लिलावामध्ये निर्लेखित साहित्याच्या खरेदी किंमतीवर १८ टक्के रक्कमेचा GST कर वेगळयाने आकारण्यात येईल.

८. लिलावामध्ये अंतिम बोली स्विकारल्यानंतर पात्र खरेदीदाराने लिलावामधील साहित्य ताब्यात घेण्यास नकार दिल्यास, त्याने जमा केलेली अनामत रक्कम रूपये १०,०००/- जप्त करून शासन खाती जमा करण्यात येईल. सदर रक्कम संबंधित खरेदीदारास परत करण्यात येणार नाही. तसेच अपात्र ठरलेल्या खरेदीदारांची जमा केलेली अनामत रक्कम रूपये १०,०००/- त्यांना त्याच दिवशी परत करण्यात येईल.

९. सदर लिलाव प्रक्रिया, जाहिरात कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही टप्प्यावर पुर्णतः किंवा अंशतः रदद करण्याचा अथवा त्यामध्ये फेरबदल करण्याचे सर्व अधिकार व अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार महासंचालक, कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल यांनाच असतील.

१०. लिलावा दिवशी इच्छुक खरेदीदारांनी खालील कागदपत्रे या कार्यालयास सादर करावीत.

१०.१ ०२ रंगीत फोटो.

१०.२ ओळखीचा पुरावा म्हणून पॅन कार्ड, आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्र.

१०.३ GST रजिस्ट्रेशन सर्टीफीकेट/ कंपनी किंवा फर्मच्या नावे साहित्य खरेदी करावयाचे असल्यास त्याचे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**लिलावाचा दिनांक व वेळ -**

दिनांक १८.०३.२०२५ (सकाळी १०.०० ते ११.०० पर्यंत- नोंदणी होईल त्यानंतर लिलाव सुर होईल. )

**कार्यालयाचा पत्ता-**

कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल
मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - ४१६३०९
दूरध्वनी क्रमांक - ०२३४६ - २७१२१२

**सही/-**
**महासंचालक**
**कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**

प्रति,

महासंचालक,
कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

विषय-: कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल यांनी जाहिर लिलावा अन्वये विक्रीस काढलेले साहित्यांची खरेदी करणेबाबत.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | खरेदीदाराचे नाव/फर्म अथवा कंपनी असल्यास त्याचे नाव | |
| २. | खरेदीदाराचा पुर्ण पत्ता | |
| ३. | खरेदीदर फर्म/कंपनी असेल तर त्यांचा पुर्ण पत्ता | |
| ४. | जाहिरातीनुसार साहित्यांची पाहणी केल्याचा दिनांक | |
| ५. | कोणते साहित्य खरेदी करणार त्याचे सविस्तर नाव व नग संख्या | |
| ६. | अनामत रक्कम भरली आहे किंवा कसे? | |

२.०० विषयांकित प्रकरणी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील नमूद सर्व सुचना, अटी व शर्ती मला/आम्हांला मान्य आहेत.

३.०० लिलावामध्ये खरेदी केलेल्या साहित्यांच्या रक्कमेवर आपले कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरण्यास माझी संमती आहे.

ठिकाण-
दिनांक-

आपला,

(खरेदीदाराचे संपुर्ण नाव व स्वाक्षरी)
संपुर्ण पत्ता व मोबाईल क्रमांक

**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**
मु.पो.- कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा- सांगली-४१६३०९ महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक -०२३४६- २७१२१२ ई - मेल -princpalkundal@gmail.com

**विषयः-** **कुंडल विकास,प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल या कार्यालयातील निर्लेखित केलेल्या वस्तूंची विक्री करणेबाबत.**

कुंडल विकास,प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने),कुंडल या कार्यालयातील निर्लेखित केलेल्या वस्तूंची दिनांक १८.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जाहिर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. तरी इच्छूक खरेदीदारांनी साहित्यांची यादी करिता तसेच इतर अधिक माहिती करिता www.kundalforestacademy.gov.in व www.mahaforest.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल यांचा राहील.

**सही/-**
**महासंचालक**
**कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**